I.O करीता



# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सातारा  **P.S.(ठाणे):** वडुज  **Year (वर्ष):** 2020

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0198  **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 29/05/2020 23:24 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार  **Date From (दिनांक पासून):** 29/05/2020

**Time Period (कालावधी):** पहर 5  **Date To ( दिनांक पर्यंत):** 29/05/2020

**Time From (वेळेपासून):** 14:28 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 14:28 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 29/05/2020  **Time (वेळ):** 23:14 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 029  **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 29/05/2020 23:14 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** वडूज,खटाव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):** वडुज

**District(State) (जिल्हा(राज्य)):** सातारा(महाराष्ट्र)

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** राजेंद्र गणपत जाधव

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1962  (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**  **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | गोपुज , खटाव,वडुज ,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | गोपुज , खटाव,वडुज ,सातारा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):** शेतकरी

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9975870106

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | राजेंद्र मारुती जगताप | | | 1. वडुज , खटाव,वडुज ,सातारा,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 3,000/ रुपये | 3,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 3,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

खबरी जबाब दिनांक 29/05/2020मी, राजेंद्र गणपत जाधव, वय 58 वर्षे, व्यवसाय - शेती, राहणार- मु पो गोपुज ता.खटाव जि.सातारा मोबाईल नंबर- 9975870106समक्ष वडुज पोलीस स्टेशन येथे हजर राहुन खबरी जबाब देतो की, मी वरील ठिकाणी माझी पत्नी असे एकत्रात राहणेस असुन शेती करतो. मला एक मुलगा रणजित व मुलगी रेश्मा असे दोन मुले आहेत. माझा मुलगा रणजित याने महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरी येथे बीटेक ॲग्रीकल्चरचे शिक्षण 2013 साली पुर्ण केले. त्यानंतर त्याने चार वर्ष वेगवेगळ्या कंपनीमध्ये काम केले. त्यानंतर त्याने पुढील शिक्षणाकरीता न्युझीलंड येथील लिंकन विद्यापीठात मास्टर ऑफ सायन्स (एमएस) साठी ॲडमिशन घेतले. तेथील विद्यापीठाची शैक्षणिक फि भरण्यासाठी आम्ही आमचे जवळचे काही पैसे, माझे मित्र व इतर नातेवाईकानी मदत केली. त्यानंतर कमी पडलेल्या पैशासाठी मी बँक ऑफ महाराष्ट्र शाखा वडुज यांचेकडुन माझे मुलाचे नावावर असले गट नंबर/सर्वे 371/3अ/3ब/प्लट नं 17 चे क्षेत्र 1.6100 आर ही मिळकत तारण ठेवुन 8,00,000/- रुपये कर्ज घेतले. त्यानंतर सदर मिळकतीवर बोजा दाखल करणेबाबत बँकेने पत्र दिले. त्याप्रमाणे आमचे मिळकतीवर बोजा चढविण्यासाठी मी दिनांक 04/03/2020 रोजी तलाठी कार्यालय, वडुज येथे गेलो. व बँकेची कागदपत्रे तलाठी बोबडे यांचेकडे दिली. त्यादिवशी तलाठी बोबडे, वडुज यांनी बँकेच्या पत्राप्रमाणे आमचे मिळकतीवर बोजाची ऑनलाईन नोंद करुन नोटीसा काढल्या. त्यानंतर ऑनलाईन फेरफार मंजुर होण्यासाठी तसेच मिळकतीवर बोजाची नोंद होण्यासाठी तलाठी बोबडे यांची मी अधुनमधुन भेट घेत होतो. त्यानंतर दिनांक 05/05/2020 रोजी मी तलाठी बोबडे यांची भेट घेणेकामी त्यांचे कार्यालयात गेलो. त्यावेळी तलाठी बोबडे यांनी माझ्याकडचे काम पुर्ण झाले आहे. तुम्ही आता सर्कल जगताप यांची भेट घ्या असे सांगितले.त्यानंतर मी वारंवार सर्कल जगताप यांच्याशी संपर्क साधत होतो त्यावेळी सर्कल जगताप हे मला तुमचे काम मी करुन देतो मला 10,000/-रुपये दया असे म्हणाले होते. त्यावेळी मी त्यांना माझ्याकडे◌ सध्या पैसे नाहीत माझ्याकडे पैशाची व्यवस्था झाल्यानंतर मी आपल्याला येवुन भेटतो असे म्हणालो. सर्कल जगताप हे माझ्याकडुन पैसे घेतल्याशिवाय माझे काम करणार नाहीत याची मला खात्री पटल्यानंतर मी सातारा ॲन्टी करप्शन कार्यालयात संपर्क साधुन माझी, जगताप सर्कल वडुज यांचेविरुध्द लाच मागणीची तक्रार दिली. तसेच मी आज दिनांक 29/05/2020 रोजी तहसिल कार्यालय, वडुज या ठिकाणी सर्कल जगताप यांना भेटायला जाणार असल्याचे सांगितले. त्यावेळी पोलीस निरीक्षक श्री.जगताप साहेब यांनी मला दिनांक 29/05/2020 रोजी 11.00 वा. स्वयंवर मंगल, कार्यालय वडुज या ठिकाणी येवुन थांबण्याच्या सुचना दिल्या.त्याप्रमाणे आज दिनांक 29/05/2020 रोजी पोलीस निरीक्षक जगताप साहेब हे स्वयंवर मंगल कार्यालय वडुज येथे आल्यानंतर माझ्याशी संपर्क साधुन मला त्या ठिकाणी बोलावुन घेतले. त्याठिकाणी पोलीस निरीक्षक जगताप साहेब हे सापळा पथकासह हजर होते. त्याठिकाणी श्री. जगताप साहेबांनी, माझी व शिक्षण विभाग प्राथमिक जिल्हा परिषद सातारा कार्यालयातील 1) सिताराम गणपत बनकर, वरिष्ठ सहायक व 2) सागर जनार्दन निकम, कनिष्ठ सहायक या दोन पंचांसह, सापळा

पथकाची ओळख करुन दिली.त्यानंतर मी माझी तक्रार थोडक्यात कथन करुन माझा लेखी तक्रारी अर्ज पोलीस निरीक्षक श्री. जगताप साहेब यांचेकडे दिला. त्याचे त्यांनी वाचन करुन माझा अर्ज दोन्ही पंचाना वाचन करणेस दिला, त्यानंतर माझ्या तक्रारीप्रमाणे माझ्याकडे वडूज गावचे सर्कल जगताप यांनी लाच मागणी केली आहे अगर कसे? याची पडताळणी करण्यासाठी पंच नं.1 म्हणुन श्री. बनकर व पंच नं.2 म्हणुन श्री. निकम यांनी काम करण्याचे पोलीस निरीक्षक जगताप साहेबांनी ठरवुन मी दिले तक्रारी अर्जावर दोन्ही पंचांनी व जगताप साहेबांनी सह्या केल्या. त्यानंतर पोनि.जगताप साहेब यांनी मला व पंच न. 1 यांना पडताळणी कारवाईचे अनुषंगाने आवश्यक त्या सुचना देवुन व्हाईस रेकर्डरसह माझ्याकडील दुचाकी वाहनाने पंच नं.1 यांचे सोबत सर्कल जगताप यांची भेट घेण्यासाठी पाठवून दिले. केले पडताळणी कारवाईमध्ये सर्कल जगताप यांची माझ्याशी समक्ष भेट झाली. त्यावेळी सर्कल जगताप यांनी माझ्याकडे माझ्या मुलाच्या नावे बँकेत मंजूर केलेल्या कर्जाचा बोजा मिळकतीवर चढवण्यासाठी 10,000/- रुपयांची लाच मागणी करुन काय आणायच ते द्या तुमची इच्छा असे म्हणुन ती रक्कम लागलीच तहसिल कार्यालय खटाव (वडूज) येथे आणुन देण्यास सांगितल्याची ध्वनिमुद्रीत झालेल्या संभाषणावरुन व माझ्या तसेच पंच नं.1 यांचे हकिकतीवरुन पोनि. जगताप साहेबांची व दोन्ही पंचांची खात्री झाली.त्यानंतर जगताप साहेब यांनी मला लाच रक्कम हजर करण्यास सांगितली असता त्यावेळी मी माझ्याकडे आत्ता 3000/- हजार रुपये उपलब्ध असल्याचे सांगुन 3000/- रुपये हजर केले. त्या नोटांचे क्रमांक एका को-या कागदावर लिहुन घेवुन त्या लाच रक्कमेस अँथ्रासिन पावडर लावणे बाबतची कारवाई खाजगी वाहनामध्ये केली. सापळा कारवाईसंबंधाने पोनि. जगताप साहेब यांनी मला व दोन्ही पंचांना तसेच सापळा पथकास आवश्यक त्या सर्व सुचना दिल्या. त्यानंतर माझ्याकडे व्हाईस रेकर्डर देवुन पंच नं.1 यांना माझ्या सोबत माझ्या दुचाकी वाहनावरुन सर्कल जगताप यांची भेट घेण्याकामी तहसिल कार्यालय खटाव (वडूज) कडे रवाना केले. आमचे पाठोपाठ पोनि. जगताप साहेब, पंच नं.2 व सापळा पथक असे खाजगी वाहनाने येवु लागले.मी व पंच नं. 1 बनकर माझ्याकडील दुचाकी वाहनावरुन तहसिल कार्यालय, वडुज या ठिकाणी गेलो. त्याठिकाणी मी दुचाकी पार्क करुन आम्ही रेव्हेन्यु क्लबमध्ये जावुन मी, मंडलाधिकारी जगताप हे बसतात त्या ठिकाणी गेलो त्या ठिकाणी ते मिळुन आले नाहीत. त्यामुळे मी, मंडलाधिकारी जगताप यांचेबाबत आजुबाजुस चौकशी केली असता ते तहसिल कार्यालयात असल्याचे सांगितले. त्यानंतर मी व पंच नं. 1 असे रेव्हेन्यु क्लब मधुन बाहेर येवुन माझ्या दुचाकी वाहनावरुन तहसिल कार्यालयाचे नविन इमारतीकडे निघालो. त्या ठिकाणी गेल्यानंतर मी वाहन पार्क करुन आम्ही दोघे तहसिल कार्यालयात गेलो. त्या ठिकाणी मी, मंडलाधिकारी जगताप आण्णा कुठे आहेत अशी विचारणा केली. त्यावेळी तेथील एका इसमाने ते इथे नसल्याचे सांगितले. त्यानंतर मी व पंच नं. 1 त्या कार्यालयातुन बाहेर आलो. त्यावेळी मी माझ्या मोबाईलवरुन मंडलाधिकारी जगताप यांना फोन केला त्यावेळी मंडलाधिकारी जगताप यांनी भैरोबाच मंदीर हाय क नाय वडुजमध्ये तिथे असल्याचे सांगितले. त्यानंतर मी व पंच नं. 1 असे माझ्याकडील दुचाकी वाहनावरुन भैरोबाच मंदीर या ठिकाणी निघालो. त्यानंतर आम्ही भैरोबाच्या मंदीराशेजारी असले एका रेशनिंग दुकानासमोर मी वाहन थांबविले. त्यानंतर मी तेथील रेशनिंग दुकानात गेलो त्या ठिकाणी एका टेबलसमोरील खुर्चीवर मंडलाधिकारी जगताप बसले होते. त्यावेळी मी हिकडं ड्युटी लागली व्हयं असे म्हणालो. त्यावेळी मंडलाधिकारी जगताप हम्म, असे म्हणुन बसा पाणी प्या असे म्हणाले. त्यावर मी पाणी पिवुन आलोय..बर भरपुर प्रयत्न केले तीन हजार रुपये जुळवलेत लक्षात आलं का समजा जरी अजुन वाटत असल तर..असे म्हणालो. त्यावर मंडलाधिकारी जगताप दया तुमाला नंतर कधी दयायचेत ती असे म्हणाले. त्यावर मी चार दिवसान लक्षात आलं का.. असे म्हणालो. त्यावर मंडलाधिकारी जगताप दया.दया असे म्हणाले. त्यावर मी तुमी आता तीन हजार रुपये तुमाला देतोय लक्षात आला का बर मी काय म्हणतुय काम आपल नडणार तर नाय ना कुठ असे म्हणालो. त्यावर मंडलाधिकारी जगताप उतारे सगळे तयार झालेती असे म्हणाले. त्यावर तक्रारदार बर.बर.. काम कुठ नाय नाय कुठ एवढी काळजी घ्या बाकीच.असे म्हणालो. त्यावर मंडलाधिकारी जगताप नाय नाय असे म्हणाले. त्यावर मी आणि जर लागलं शिल्लक दोन चार दिवसांनी परत बघु पण आता तीन हजार रुपये हायत एवढे घ्या असे म्हणालो. त्यावर मंडलाधिकारी जगताप चालतय, झालं काम तुमचं असे म्हणाले. त्यावर मी, झालं असे म्हणुन लाच रक्कम स्विकारल्याचा पुर्व नियोजित इशारा करण्यासाठी कार्यालयातुन बाहेर येवुन 14.28 वाजणेचे सुमारास डोक्यावरून गांधी टोपी काढुन लाच रक्कम स्विकारलेचा पुर्व नियोजित इशारा केला. तो इशारा पाहुन पोनि. जगताप साहेब, पंच नं.2 व सापळा पथक असे सर्वजण माझ्याजवळ आले. त्यावेळी पोनि.जगताप साहेब यांनी माझ्याकडून व्हाईस रेकर्डर काढून घेऊन तो बंद केला व मला बाजुला थांबणेस सांगितले. त्यानंतर सर्वजण रेशन दुकानात गेले. काहीवेळाने पोनि. जगताप साहेबांनी मला रेशन दुकानात बोलावुन शटर व लाईट बंद करुन कृत्रीम अंधार करुन माझे हातांची व अंगावरील कपडयांची अल्ट्रा व्हायोलेट दिव्याचे प्रकाशात तपासणी केली असता माझ्या उजव्या हाताचे बोटांचे पेऱ्यास तसेच तळहातास व नेहरु शर्टचे डाव्या बाजुचे खिशाचे आतील बाजुस व कडास अँथ्रासिन पावडर लागलेची फिक्कट निळसर चकाकी दिसून आली नंतर दुकानामध्ये उजेड केला. त्यानंतर पोनि. जगताप साहेबांनी मला दुकानाच्या बाहेर थांबण्यास सांगितले.त्यानंतर मंडलाधिकारी जगताप यांना ताब्यात घेवुन पोनि. जगताप साहेब व दोन्ही पंच तसेच सापळा पथक व मी असे सोबतच्या वाहनांनी शासकीय विश्रामगृह वडुज येथे आलो. त्या ठिकाणी पोनि.जगताप साहेबांनी मला विश्रामगृहाचे बाहेर थांबण्यास सांगुन सर्वजण विश्रामगृह कक्ष नं.2 मध्ये गेले. त्यानंतर मला कक्षामध्ये बोलावुन घेवुन दोन्ही पंचांनी माझी अंगझडती घेतली. त्यानंतर पोनि. जगताप साहेबांनी, माझे व पंच नं. 1 बनकर यांचे सांगणेप्रमाणे संभाषणाचे स्क्रिप्ट मधील नामोल्लेख केला. त्यानंतर मला पुन्हा कक्षाचे बाहेर थांबण्यास सांगितले. त्यानंतर काही वेळाने पुन्हा मला कक्षात बोलावुन घेवुन मला घडलेली हकिकत विचारली. तरी दिनांक 29/05/2020 रोजीचे पडताळणी व सापळा कारवाईमध्ये राजेंद्र मारुती जगताप, वय 57 वर्षे, मंडलाधिकारी, वडुज ता.खटाव जि.सातारा रा.तलाठी कलनी, विलासपुर, गोडोली, सातारा यांनी माझ्याकडे माझ्या मुलाच्या नावे बँकेत मंजूर केलेल्या कर्जाचा बोजा मिळकतीवर चढवण्यासाठी 10,000/- रुपयांची लाच मागणी करुन काय आणायच ते द्या तुमची इच्छा असे म्हणाले. त्यानंतर माझ्याकडे 3000/- रुपये लाच रक्कम उपलब्ध झाल्याने ती लाच रक्कम सर्कल जगताप यांनी रेशन दुकानात दिनांक 29/05/2020 रोजी 14.28 वाजण्याचे सुमारास माझ्याकडुन स्विकारली म्हणुन माझी त्यांचे विरुध्द तक्रार आहे. ही खबर दिली

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): ashok shivram patil(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत नोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15.Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अंमलदार
वडूज पोलिस स्टेशन

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): ashok shivram patil
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /**
(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)